**नि. फौ. खटला क्र.१३८/२०२२**

**निशाणी क्र.३५**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करते की,**

**माझे नांव** : बेबीसरोजा हणमंत हुडे,

**वय** : ४० वर्षे, **काम** : घरकाम,

**राहणार** : कवठाळा, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखते. आजरोजी न्यायालयामध्ये आरोपी सिध्देश्वर हजर आहे आणि शिवनंदा गैरहजर आहे. दि.१६/१०/२०२२ रोजी मी माझ्या आईला घेऊन उपचारासाठी उदगीर येथील दवाखान्यात गेले होते आणि सायंकाळी उदगीर येथील माझ्या बहिणीच्या घरी मुक्कामी होते. दि.१७/१०/२०२२ रोजी सकाळी मी माझ्या घरी कवठाळा येथे गेली. त्यावेळी घरातील सर्व सामान विखुरलेले होते, हारभऱ्याची दाळ २५ किलो, तुरीची दाळ ३० किलो, मुगाची दाळ २५ किलो, उडीद दाळ १० किलो, तांदुळ ५० किलो, ज्वारी २५ किलो, दोन ताडपत्री व हारभऱ्याच्या दाळीच्या कोठीमधील रोख रक्कम ₹१०,०००/– मिळून आले नाहीत. त्यानंतर मी आरोपीच्या घरी गेली आणि सिध्देश्वरला माझे सामान का उचलले असे विचारले. त्याने मला काय करून घ्यायचे ते घे, सामान देत नाही असे म्हटले. त्यानंतर मी पोलीस ठाण्यामध्ये गेली आणि अर्ज दिला. पोलिसांनी त्यानंतर चौकशी केली. आता मला अर्ज वजा खबर दाखविली. ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.३६** देण्यात येते. पोलिसांनी सर्वप्रथम माझा घेतलेला नसल्याने मी जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे गेली होती आणि त्यानंतर पोलिसांनी अर्ज घेतला. त्यामुळे सदर विलंब झालेला आहे.

सरतपास पूर्ण.

**:: <u>आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. बिरादार यांच्यामार्फत</u> ::**

०२. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले. मला दोन बहिणी आणि दोन भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि माझा भाऊ गुणवंतचे लग्न एकाच वेळी झालेले आहे. माझे लग्न होऊन तीस वर्षे झाली परंतु मला लग्नाची तारीख आठवत नाही. माझ्या लग्नानंतर चार महिने मी सासरी होती. त्यानंतर मी माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गुणवंतच्या पत्नीला त्रास दिला आणि त्यामुळे ती तिच्या माहेरी निघून गेली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आणि माझ्या आईच्या त्रासाला कंटाळून गुणवंत आणि त्यांच्या पत्नीचा घटस्फोट झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आणि आईच्या त्रासामुळे गुणवंतने आत्महत्या केली. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयामधून गुणवंतचे वारस प्रमाणपत्र काढले होते.

प्रश्न – तुम्ही गुणवंतची मिळकत तुमच्या नावे करून घेतली ?
उत्तर – माझ्या वडिलांनी सदर मिळकत माझ्या नावे करून दिली.

०३. आरोपींची वर्ष २००९ मध्ये लग्न झाल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ला लग्नानंतर चार महिन्यामध्ये मी आणि माझ्या आईने त्रास देणे सुरू केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र.२ ला विहिरीत ढकलून देण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ ने माझ्या आणि माझ्या आईविरुध्द केस केली होती. माझे वडील वर्ष २०२२ मध्ये मृत्यू पावले. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि माझ्या आईने आरोपींना माहिती न करता न्यायालयामधून वारस प्रमाणपत्र काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व तानाजी यांना डावलून मी वडिलांची मिळकत माझ्या नावे करून घेतली. आरोपी क्र.१ ने वडिलांच्या वारस प्रमाणपत्राविरुध्द उदगीर येथील न्यायालयात अपील केलेले आहे, हे मला माहीत नाही.

०४. देवणी ते कवठाळा हे अंतर अंदाजे पंधरा किलोमीटर आहे. कवठाळा येथून

देवणी येथे जाण्यासाठी एक तास लागतो. मी जिल्हाधिकारी कार्यालयात गेल्याबाबत कागदपत्रे पोलिसांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतीही घटना घडली नसताना आणि दुसऱ्याच्या सांगण्यावरून आरोपींविरुध्द खोटी केस केली. कथित चोरी होताना मी बघितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन हडपण्यासाठी आरोपीविरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.१५/०७/२०२६.